सामना

१० मार्च २०१७, शुक्रवार • पृ • ०७ •

Vishwatmak Om Gurudev College of Engineering
Library

## पदवीदान सोहळा

वासिंद : विश्वात्मक जंगली महाराज ट्रस्टच्या ओम गुरुदेव अभियांत्रिकी महाविद्यालय आघई येथे झालेल्या पदवीदान समारंभात मुंबई विद्यापीठाच्या अभियंता पदवीधारक २४९ विद्यार्थ्यांना कार्यक्रमात पदव्या प्रदान करण्यात आल्या. यावेळी आश्रम संचालक मोहन शेलार, नाशिक विभाग अध्यक्ष दादासाहेब बोडके, संस्थेचे कार्याध्यक्ष उमेश जाधव, सचिव विजय वाडेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य अजय रडके आदी मान्यवर उपस्थित होते. ज्ञानाला ध्यानसाधनेची जोड देऊन भौतिक प्रगतीसोबत आत्मोन्नती साधावी असा संदेश कार्याध्यक्ष जाधव यांनी दिला.